प्रसिध्दीपत्रक दि. २१/११/२०२३

विषय :- **जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात आयोजित "हेल्पडेस्कबाबत"**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात असलेले प्रलंबित चलन केसेसचा निपटारा करणे करीता पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय, बंगला नं. ६, येरवडा पोस्ट ऑफिस शेजारी, पुणे येथे दि. ०९/१२/२०२३ रोजी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर लोक अदालतीचे अनुषंगाने दिनांक २१/११/२०२३ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे या ठिकाणी श्री. के. पी. नांदेडकर, जिल्हा न्यायाधिश १, पुणे व प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधिश, पुणे व श्रीमती सोनल पाटील, सचिव, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, शिवाजीनगर, पुणे यांचे समवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार दि. २२/११/२०२३ रोजीपासून वाहतूक शाखा कार्यालय, बंगला नं. ६, येरवडा पोस्ट ऑफिस शेजारी, पुणे येथे प्रलंबित वाहतूक चलनांचे तडजोडीनंतर दंडातील सवलतीबाबतच्या माहितीचा हेल्पडेस्क सुरु करण्यात येत आहे.

दि. ०९/१२/२०२३ रोजी आयोजित लोकअदालती मध्ये पुणे शहर, पुणे ग्रामीण, पिंपरी चिंचवड व पुणे हायवे या आखत्यारितील नागरिकांना मा. न्यायालयाकडुन वाहतूक शाखेव्दारे मोठया प्रमाणात समन्स बजावणी करण्यात आलेली आहे. समन्स बजावण्यात आलेल्या नागरिकांची लोकअदालतीमध्ये गैरसोय होवू नये म्हणुन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे पिंपरी चिंचवड, पुणे ग्रामीण व प्रशासन यांनी विशेष काळजी घेतली असून लोकअदालतीच्या खटल्याचा निपटारा एकत्रितरित्या कमीत कमी वेळेत होवून नागरिकांच्या वेळेचा अपव्यह होवू नये यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

त्याअंतर्गत लोकहितासाठी व प्रलंबित खटल्यांची निर्गती करण्यासाठी नागरिकांचे वाहनांवरील प्रलंबित असलेले वाहतूक नियमांचे भंग केलेल्या चलनाची निर्गती तडजोडअंती सूट देवून करण्यात येणार आहे. ज्या वाहनचालकांच्या वाहनांवर वाहतूक नियमभंग केलेबाबत केसेस प्रलंबित आहेत, अशा वाहनचालक / मालक यांनी दि. २२/११/२०२३ रोजी पासून सकाळी ११.०० ते १४.०० व १५.०० ते १७.०० या वेळेत पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय, येरवडा पुणे येथे येवून आपले वाहनावर असलेल्या प्रलंबित केसेसच्या निर्गतीचे अनुषंगाने उपस्थित राहिल्यास वाहन चालकांवरील प्रलंबित दंडाची रक्कम तडजोडीनंतर वाहन चालकांवरील दंड चलान कमी होईल. सदर हेल्पडेस्क अंतर्गत पुणे शहर, पुणे ग्रामीण व पिंपरी चिंचवड यांचेकडील प्रलंबित वाहतूक चलनांचे तडजोडी करीता वेगवेगळे टेबल्स लावण्यात येणार आहे.

**मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे संकल्पनेतून व मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली नागरिकांना 'जिल्हा हेल्प डेस्क' ही सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा.**

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**सर्व संबधितांना.**